# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ.

## (परीक्षा विभाग)

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५
दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
Email Id: coegondwana@gmail.com

जा.क्र./गों.वि./परीक्षा वि /670/२०१५ दिनांक: 03/06/२०१५

## परिपत्रक

सर्व संबधित महाविद्यालयातील प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की,उन्हाळी २०१५ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Photocopy /Xerox, Challenge of Valuation तसेच Retotalling of Paper यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

### १. Procedure of Photocopy/Xerox

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Photocopy /Xerox पाहिजे असल्यास सदर विद्यार्थ्यांने त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून Appendix-A हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये प्रतिपेपर ३००/- रूपये शुल्क भरावे आणि महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. या सदराखाली विद्यार्थ्यांना Photocopy/Xerox देण्यात येईल. **(फक्त दोन विषयाकरीता)**

### २. Precedure Of Challenge Of valuation/Revaluation

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे Challenge of Valuation/Revaluation करावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्याने त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून Appendix-B हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये पुर्नमुल्यांकनासाठी प्रतिपेपर ५००/– रूपये शुल्क भरावे आणि महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. **(फक्त दोन विषयाकरीता)** या पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे फक्त Revaluation करण्यात येईल याची नोंद घ्यावी. Xerox प्रत पाहिजे असल्यास त्याचे प्रति पेपर ३००/– रूपये शुल्क सोबतच भरावे लागेल.

### ३. Retotalling of Papers

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे Retotalling करावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्यांने त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून Appendix-C हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये प्रतिपेपर १००/– रूपये भरावे त्यानंतर महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. **(विद्यार्थ्यांना Retotalling सर्व विषयाचे सुध्दा करता येईल)**

धनाकर्ष हा कोणत्याही राष्ट्रीय कृत बॅंकेचा व तो **"वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली"** यांचे नावे असावा किंवा महाविद्यालयाला विद्यापीठामध्ये रोखीने सुध्दा शुल्क भरता येईल.

ज्या अभ्यासक्रमाचे निकाल घोषीत होतील त्या तारखेपासून वरील प्रक्रियेकरीता दहा दिवसाची वेळ राहील. तसेच असे सर्व आवेदन पत्र महाविद्यालयाने तीन दिवसाच्या आत विद्यापीठात जमा करावे. याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली